# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-३१ दिनांक - ०३/०२/२०२४

## फिल्म व सिरीयलमध्ये काम करण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या गरीब व अल्पशिक्षित मुलींना फसवुन त्यांच्याकडुन वेश्यागमन करुन घेणाऱ्या ०२ पुरुष वेश्यादलालावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाने कारवाई करुन त्यांच्या ताब्यातुन ०४ पिडित मुलींची सुटका.

दि. ०२.०२.२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना बातमीदारकडून बातमी मिळाली की, वेश्यादलाल इसम नामे सुलेमान नारकांथोल्लु, व्यवसाय-फिल्म प्रोडुसर रा. मड मार्वे, मलाड प., मुंबई व त्याचा साथीदार चंद्राराज उर्फ मायकल मुत्तीपोग यांचे संपर्कात हिंदी सिरीयल, वेब सिरीज, फोटो शुट व युट्युबमध्ये साईड हिरोईन म्हणुन काम करणाऱ्या मुली आहेत. प्रोडुसर सुलेमान नारकांथोल्ल्यु यास गिऱ्हाईकाने फोनद्वारे संपर्क साधला की, तो हिंदी सिरीयल, वेब सिरीज, फोटो शुट व युट्युबमध्ये साईड हिरोईन म्हणुन काम करणाऱ्या मुलींना मिरा-भाईंदर, गोराई (बोरीवली) मुंबई, ठाणे, लोणावळा, दमन या परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकास रुम बुक करावयास लावुन किंवा गिऱ्हाईकाचे सोयीनुसार शॉर्ट टाईमसाठी एका मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला व त्याचे कमीशन असे एकुण ४०,०००/- रु घेवुन पुरुष गिऱ्हाईकास वेश्यागमनासाठी मुली पुरवितो.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक व दोन पंच बोलावुन वेश्यादलाल सोलोमान नारकांथोल्ल्यु याने सांगितल्याप्रमाणे बनाना लिफ हॉटेल, इंद्रलोक रोड, गोल्डन नेस्ट, नवघर, भाईंदर पुर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन १६.१५ वा. छापा टाकला असता, वेश्यादलाल आरोपी नामे १) सोलोमन रतनामय्या नारकांथोल्लु, वय ५५ वर्षे व त्याचा साथीदार २) चंद्राराज उर्फ मायकल डेवीड मुत्तीपोगु, वय २२ वर्षे यांनी आपसात संगणमत करुन ०४ पिडित मुलींना सोबत आणुन वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या बोलीवर रक्कम ठरवुन स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम वेश्यादलाल सोलोमान नारकांथोल्ल्यु याने स्विकारल्याने त्यांना सापळयातील रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०४ पिडीत मुलींची सुटका केली. सदरबाबत ताब्यातील आरोपी नामे १) सोलोमन नारकांथोल्लु व त्याचा साथीदार २) चंद्राराज उर्फ मायकल मुत्तीपोगु यांच्याविरुध्द सफौ/रामचंद्र शिवाजी पाटील यांनी सरकार तर्फे दिल्याने फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ९०/२०२४, भा.द.वि.स कलम ३७०(२)(३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोनि.समीर अहिरराव, सफौ/उमेश पाटील, सफौ/रामचंद्र पाटील, पोहवा/किशोर पाटील, पोशि/चेतनसिंग राजपुत, चा.पोहवा/सम्राट गावडे, मपोशि/अश्विनी भिलारे व मपोशि/शितल जाधव, सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांनी केली आहे.